जा क्र मसके/वाकवली/प्रअवा/९६६ /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.
दिनांक : 08 MAR 2023

प्रती,

मा.प्रभारी अधिकारी,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

**विषय : वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील सुकी काजू बी गोळा करणे हे काम ठेका पध्दतीने करण्याच्या जाहीरातीस विद्यापीठ संकेतस्थळावर (www.dbskkv.org) प्रसिध्दी देणेबाबत...**

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग या प्रक्षेत्रावर सुकी काजू बी गोळा करणे हे काम ठेका पध्दतीने करावयाचे आहे. तरी याबाबतची प्रसिध्दी विद्यापीठ संकेतस्थळावर **(www. dbskkv.org)** करणेस विनंती आहे.

**सोबतः—** प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

आपला विश्वासू,

8/3/2023
संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी

Scanned by CamScanner

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
## मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.ता.दापोली, जि.रत्नागिरी.

जा.क्र/मसंकें/प्रअवा/ ६६५ /२०२३ दिनांक 08 MAR 2023

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग या प्रक्षेत्रावर खालीलप्रमाणे काम ठेका पध्दतीने करावयाचे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंदाजे जमा होणारी काजु बी | कालावधी |
|---|---|---|---|
| १) | सुकी काजू बी गोळा करणे. | ५ टन | ०३ एप्रिल २०२३ ते २८ एप्रिल २०२३ |

वरीलप्रमाणे कामे ठेका पध्दतीने दिनांक ०३/०४/२०२३ ते २८/०४/२०२३ या कालावधीत करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाच्या दरपत्रकामध्ये सुकी काजू बी गोळा करणे प्रति किलो या दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमतीपत्र या कार्यालयात दिनांक ः २३/०३/२०२३ पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"वाकवली विभागातील सुकी काजू बी गोळा करणे या कामाचे दरपत्रक."** असा उल्लेख करावा, लिफाफा बंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (वाकवली विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबावदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून संमतीपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमुन्यामध्येच सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे.

- **उपरोक्त कामाच्या अटी व शर्ती:—**

१) ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरूप पाहुनच दरपत्रकामध्ये दर सादर करावेत.

२) ठेका मंजुरी आदेश प्राप्त होताच मंजुरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनानुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे. दरपत्रकासोबत पॅनकार्ड ची छायांकित प्रत जोडणे आवश्क आहे.

३) प्रक्षेत्रावरील कामासाठी आवश्यक निविष्ठांचा पुरवठा संबंधित कार्यालयामार्फत केला जाईल पुरविण्यात आलेल्या निविष्ठा कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दररोज संबंधीतकडे जमा करावयाचे आहे.

४) ठेका अपुर्ण सोडल्यास ठेक्याच्या उर्वरीत बीलाची अदायगी केली जाणार नाही व सदर कामाचा अनुभव पुढिल ठेक्याच्या वेळी गृहित धरला जाणार नाही. ठेक्याबाबत करावयाची

(PTO)

Scanned by CamScanner

कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अव केल्यास ठेका त्वरीत रद्द केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीच दखल घेतली जाणार नाही.

५) ठेकेदाराकडे पॅनकार्ड व बॅक खाते असणे बंधनकारक आहे. ठेकेदाराच्या देयकाची अदायगी त्यांचे बॅक खाती **NEFT/RTGS** धनाकर्षादवारे करण्यात येईल.

६) ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्यासबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

७) कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या देयकामधून संबंधित नुकसानीची किंमत व सुलकरण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

८) ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

९) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक **SLP-5443/90** नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजूरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेकाकालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही.

१०)ज्याकंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात रू. १००/— बॉण्ड पेपरवर करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

११) शासन निर्णयानुसार पध्दतीप्रमाणे ठेकेदाराचे देयकातुन आयकर कपात करण्यात येईल.

**सोबत:—दरपत्रक मसुदा**

८/३/२०२३

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

**प्रत माहितीसाठी सादर...**

१ नोटिस बोर्ड मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
२ नोटिस बोर्ड भासुयो/कंदपिके मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.
३ ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/टेटवली/सुखदर/कुंभवे,ता.दापोली/खेड

Scanned by CamScanner

श्री / श्रीमती . ____________________

मु . पो . ____________ ता . ____________

जि . रत्नागिरी .

दि .

प्रति,

मा . संचालक,

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,

ता.दापोली,जि.रत्नागिरी.

विषय : वाकवली प्रक्षेत्र विभागातील सुकी काजू बी गोळा करणे हे काम ठेका पध्दतीने करण्याच्या दरपत्रकाबाबत...

महाशय,

वरील विषयान्वये मी आपणास कळवू इच्छिते/इच्छितो की, मी आपल्या मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली प्रक्षेत्र विभागातील सुकी काजू बी गोळा करणे हे काम दिनांक ०३/०४/२०२३ ते २८/०४/२०२३ या कालावधीत आपल्या अधिका-यांच्या सुचनेनुसार आपल्या अटी/शर्तीस अधीन राहून करावयास तयार आहे . मी प्रक्षेत्रावरील कामाचे स्वरूप प्रत्यक्ष पाहीले आहे . सदर कामांसाठी मी खालील प्रमाणे दर सादर करीत आहे .

| अ.क्र. | कामाचा तपशिल | काजु बी गोळा करण्याचा प्रति किलोचा दर |
|---|---|---|
| १) | सुकी काजू बी गोळा करणे. | |

तरी माझे दरपत्रक मंजूर करून मला संबंधीत कामाचा ठेका आपल्या प्रक्षेत्रावर काम करण्याची संधी द्यावी . ही विनंती .

सोबत:—

आपला विश्वासू

दिनांक:—

ठिकाण:—

नाव:—

पत्ता:—

भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्र:—

Scanned by CamScanner